झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१. फॅक्सः ९१-२२-२६५९०४५७
दूरध्वनी: ०२२-२६५९०५१९/०४०५/१८७९/०९९३
Email : info@sra.gov.in

जा.क्र.मुंबई/झोपुप्रा/मुकाअ/परिपत्रक/परि-२/वा.नि./सन २००१/७६८
दिनांक : ०६ /०४/२००१

परिपत्रक क्रमांक --- ९४

# -: परिपत्रक :-

विषय : झोपडपटटी पुनर्वसन योजनेत परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारक मयत झाल्यास त्यांचे कायदेशिर वारसांचे पात्रतेबाबत व संस्थेतील सभासदत्व बाबत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सक्षम अधिकारी(अप्पर/उपजिल्हाधिकारी,(अतिक्रमण/ निष्कासन), मुख्य अधिकारी,मुंबई बोर्ड/म्हाडा, सहाय्यक आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका विभाग) यांचेकडून परिशिष्ट-२ मंजूर झालेनंतर परिशिष्ट-२ मधील पात्र झोपडीधारक (निवासी/ अनिवासी/ निवासी-अनिवासी) मयत झाल्यास मूळ पात्र झोपडीधारकाचे पश्चात त्यांचे वारसांचे पात्रतेबाबत व संस्थेत सभासद म्हणून सहभाग करुन घेणेबाबत कार्यवाही होणेकरीता खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

**१) परिशिष्ट-२ मध्ये पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीत सदनिका/गाळयांचे वाटप होणेपूर्वी :-**

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत वरील सक्षम प्राधिकारी (Competent Authority) यांचेकडून परिशिष्ट-२ मध्ये झोपडीधारकांची पात्रता निश्चित झालेनंतर सदर परिशिष्ट-२ मधील मूळ पात्र झोपडीधारक मयत झाल्यास अशा पात्र झोपडीधारकांचे वारसांचे नाव परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट करणेसाठी **उपजिल्हाधिकारी,झो.पु.प्रा.** यांनी संबधित झोपडीधारकाचे वारसाबाबत सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून त्या वारसाचे नांव परिशिष्ट-२ मध्ये मयत झोपडीधारकांचे ऐवजी समाविष्ट करावे.

२) <u>परिशिष्ट-२ मध्ये पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीत सदनिका/गाळयांचे वाटप झाल्यानंतर :-</u>

परिशिष्ट-२ मध्ये पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीत सदनिकेचे/गाळयाचे वितरण झालेनंतर परिशिष्ट-२ मधील मूळ पात्र व्यक्ती मयत झाल्यास अशा पात्र झोपडीधारकांच्या वारसांनी संस्थेकडे कायदेशिर वारस म्हणून आवश्यक पुराव्यासह सभासदत्व मिळणेबाबत व वारसाचे नांवे सदनिका हंस्तारण करणेबाबत रितसर अर्ज करावा. सदर अर्ज संस्थेस प्राप्त झालेनंतर संस्थेने अर्ज प्राप्त झालेपासून १५ दिवसात संबधित अर्जाची छाननी करून सहपत्रासह छायांकित प्रत पुढील परवानगीसाठी **सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,झो.पु.प्रा.** यांचेकडे पाठवावी.

१. **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,झो.पु.प्रा.** यांनी वरील प्रमाणे संस्थेकडून सहपत्रासह वारसांचे अर्ज प्राप्त झालेनंतर संस्थेस मंजूर उपविधीतील क्रमांक **१७(अ) १९, ३४, ३५, ३८, ३९** या मधील तरतूदीचा अवलंब करून नियमानूसार संस्था पातळीवर पुढील कार्यवाही करणेबाबत संबधित संस्थेस सूचना दयावात.

२. **सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झो.पु.प्रा.** कार्यालयाकडून संस्थेस मूळ पात्र झोपडीधारकांचे वारसांना सभासद करून घेण्याबाबत परवानगीचे पत्र दिल्यानंतर **संस्थेने** अशा संबधित वारसांना सभासद करून घेण्याची कार्यवाही उपरोक्त नमूद उपविधीतील तरतूदींचा अवलंब करून दोन महिनेचे आत करावी. संस्थेकडून सदरची कार्यवाही विहित मुदतीत न केल्यास संबधित संस्थेविरूध्द सहकार कक्षाकडून (सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम,१९६१ यामधील तरतूदीस अनुसरून नियमानूसार पुढील कारवाई करणेत यावी.

वरील परिपत्रकीय सूचनेची पुनर्वसन योजनेतील सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थांनी नोंद घेवून तशी अंमलबजावणी करावी व प्राधिकरणातील संबधित विभागानी परिपत्रकीय सूचनेनूसार कार्यवाही करावी.

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई.**